Aets Commeece. college
Vaduj.

Name - Galande Navnath
Peakash.

Roll No. - 372
sub - co-opeeation
class - B. com III
Teacher - Khot C.M.
Year - 2018-19.

Scanned with CamScanner

प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था म्हणजे काय? सांगून त्याची कार्ये स्पष्ट करा.

प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थान्चा विकास ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अल्प व मध्यम मुदतीच्या कर्जपुरवठा करुन शेतीच्या विकास साधणे व जनतेच्या आर्थिक जीवनात सकलाग्र बदल घडवून आणणे हा आहे. प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था या प्रामुख्याने ग्रामीण भागात स्थापन झालेल्या असतात.

बी - मुखर्जी -

आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्या-साठी व शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी परस्पर सहाय्य व सहकार्याच्या तत्वावर ग्रामीण भागातील लोकांनी स्थापन केलेली संस्था म्हणजे प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था होय.

Scanned with CamScanner

Page:
Date :

प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थाची कार्ये -
प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची कार्ये पुढीलप्रमाणे -

1) कर्जपुरवठा -
ग्रामीण भागातील संस्थेच्या सभासदांना अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा या संस्थेद्वारे केला जातो. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मदतीने शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जे व अनुदान या संस्थामार्फत दिले जाते.

2) कृषी वस्तूंचा पुरवठा -
शेतीसाठी उपयुक्त अशी बी-बियाणे, जंतुनाशके, खते, पशुखाद्य इ. प्रकारच्या वस्तूंचा पुरवठा योग्य किंमतीत व नियमितपणे करण्याचे कार्य केले जाते.

3) शेतीसाठी सेवा -
शेतकरी वर्गास त्याने उत्पादन केलेल्या शेतमालाच्या साठा करण्यासाठी सुविधा देणे,

शेतमाल बाजारपेठेत पाठविण्यासाठी मदत करणे, शेतकऱ्यांची मालविक्रीची बिले संबंधित व्यापारी किंवा संस्थेकडून वसूल करून शेतकऱ्यास देणे इ. सेवा दिल्या जातात.

4) जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा –
जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा होण्याच्या बाबतीत जनतेच्या अनेक समस्या असतात. या संस्था मार्फत ग्रामीण जनतेला अन्नधान्य, रॉकेल, साखर इ. वस्तूंचा पुरवठा नियमितपणे व योग्य किंमतीत केला जातो. त्यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील जनतेचे जीवन सुसह्य बनते.

5) अवजारांची उपलब्धता –
शेतीसाठी शेतकरीवर्गास लहान-मोठी अवजारे व यंत्रांची आवश्यकता असते. त्यामुळे प्राथमिक कृषी सहकारी संस्था शेतकऱ्यांना अशी अवजारे व यंत्रे उपलब्ध करून देतात.

Scanned with CamScanner

Page:
Date :

6) शेती विकास –
शेती विकासाच्या दृष्टिनून मातीपरिक्षण, पीक घेणे, खतांचा वापर, जंतुनाशकांचा वापर नैसर्गिक आपत्ती, आधुनिक शेतीतंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना देण्याच्या बाबतीत या संस्था म्हणतात.

7) बचती व ठेवींना प्रोत्साहन –
या संस्थेद्वारे सभासदांना अल्प ठेवी, बचत ठेवी यांची सवय लावणे तसेच सभासदांकडून मुदती ठेवी गोळा करणे याकडे लक्ष दिले जाते.

8) सभासदांना शिक्षण –
सभासदांना परस्पर सहकार्य, स्वावलंबन, बचत करणे इ. चे महत्त्व समजावून सांगणे तसेच नवीन शेतीतंत्राची व पद्धतींची माहिती देणे, शेतीअवजारे व यंत्राच्या वापराची शिक्षण देणे, शेतीसंबंधित असणाऱ्या समस्यांसाठी मार्गदर्शन करणे इ. कार्य या संस्था करतात.

Scanned with CamScanner

9) कृषीउद्योगांच्या विकासास मदत –
कृषीउत्पादनवाढीस मदत करून प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था ग्रामीण व शहरी भागातील कृषी उद्योगांच्या विकासास मदत करतात. यामध्ये साखर कारखाने, भातगिरण्या कापड कारखाने इ. च्या विकासास अप्रत्यक्षपणे मदत करीत असतात.

10) पीक कर्जाचा पुरवठा –
प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांच्या कार्यात बदल झालेला आहे. त्या फक्त अल्प मुदतीची कर्जे कृषी उत्पादक साहित्यांचे वाटप करून देतात.

अशा प्रकारे वरील कार्याद्वारे ग्रामीण जनता व शेतकऱ्यांची सेवा या संस्था करित आहेत.

Scanned with CamScanner